## <u>रे.दि.मु.क्र. ११०/२००९ मधील निशाणी १०८ वरील आदेश</u>

सदरहू अर्ज वादींनी, मयत वादी यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादी शंकर विष्णू शिंदे हे दि.०८/०९/२०२३ रोजी मयत झाले. अर्जामधील नमूद कारणांमुळे विहीत कालावधीमध्ये वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. दावा चालविण्याकरीता अबेटमेंटचा आदेश रद्द करून सदरचा अर्ज मंजूर करणे अत्यंत गरजेचे आहे. अर्ज मंजूर न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली. प्रतिवादींचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरहू अर्जातील कारण संयुक्तीक नाही. वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास जाणीव पूर्वक विलंब केल आहे. करीता, त्यांनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली. विकल्पेकरून, अर्ज मंजूर करणेचा झालेस रू. ५०००/– चे खर्चावर मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादी शंकर विष्णू शिंदे हे दि.०८/०९/२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज दि.२५/०१/२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदरचा दावा कब्जा मिळणेकरीता दाखल केले आहे. वादीचा झालेला विलंब जाणीवपूर्वक असल्याचे दिसून येत नाही. सदरची परवानगी न दिल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादींचे तसे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेला विलंब हा प्रतिवादींना योग्य तो खर्च देवून त्याची भरपाई करण्यासारखा आहे. परिणामस्वरूप, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

### <u>– : आ दे श :–</u>

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी १०८) रक्कम रुपये २००/– चा खर्च प्रतिवादीना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. सदरचा खर्च हा पुढील तारखेपर्यंत देण्याचे आहे.

२) वादीचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश येणेप्रमाणे रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2024.04.25 17:06:26 +0530

पाटण (प्र.शं. गिरगांवकर )

दि. २५/०४/२०२४. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.